पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
गक्षेका/ ४ / कावि / २८ /२०१९
दिनांक : २६/०६/२०१९

प्रति,

मा. ---- -------------

सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

**विषय:** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा **सोमवार दि.५/८/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/०८/२०१९ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ग प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ४**

**दिनांक: ५/०८/२०१९** वेळ: सकाळी **११.०० वाजता**

---------------------------------------------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ५/०८/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह " येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दि.८ /०७/२०१९ रोजीचे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रम पत्रिका क्र.३ ) कायम करणे.

विषय क्रमांक १) मा.माया बारणे यांचे दिनांक १७/६/२०१९ चे पत्रानुसार मौजे थेरगाव सर्वे नं.१४/२ जयभवानी नगर सदर भागातील वाढती रहदारी लक्षात घेता ९ मीटर रस्ता करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अन्वये मान्यता देणे कामी व सुचना व हरकती अंतिम निर्णय घेणेकामी सदरचा विषय पुढील कारवाई करण्याकरीता व शासनाला सदर प्रस्ताव सादर करण्यास माननीय आयुक्त यांना अधिकार प्रधान करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.संदिप वाघेरे यांचे दिनांक ८/०७/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी प्रभाग क्र.२१ मधील गंगवा चौक (नवमहाराष्ट्र विद्यालयामागे) येथे सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झालेली असुन सदर ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असुन नागरिक सदरचे शौचालय पाडण्याची विनंती करीत आहेत. परिसरातील बहुतांश नागरिकांनी वैयक्तिक शौचालय बांधुन घेतलेली आहेत. तरी सदर विषयास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) मा.सुनिता तापकीर यांचे दि.८/७/२०१९ चे पत्रानुसार मौजे रहाटणी येथील स.न.६७,६८,६९ व ७१ या परिसरातील रस्ते कलम २०५ अन्वये घोषित करणेत यावे.

मौजे रहाटणी येथील पुढीलप्रमाणे नागरिकांचे सोयीचे दृष्टीने आवश्यक असलेने ते महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घो षित करणेत यावा, तसेच

१) स.नं.७१,७२ मधील १२.०० मी व ९.०० मी.डी.पी रस्त्याचे जंक्शन पासुन पुर्वेस १८.०० मी.डी.पी रस्त्यापर्यंत.

२)स.न.६८ मधील NON.D.P ७.५० मी.रस्त्यापासुन ६.०० मी. मोरया कॉलनीतील बलकवडे चाळ व त्यापुढे दक्षिणेस.

३)स.नं.५९ मधील पुर्व – पश्चिम १२.०० मी डी पी रस्त्यापासुन उत्तरेकडे जाणारा व

तेथुन पुढे यश कॉलनी स.न.६६,६७ च्या हद्दीवर पश्चीमेकडे जाण्यासाठी ६.०० मी.रस्त्याची आवश्यकता असलेने सदरचे रस्ते महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४) मा.सचिन भोसले यांनी दि.१५/२/२०१९ रोजी मा.आयुक्त यांना दिलेले पत्रान्वये , मा.कार्यकारी अभियंता, स्थापत्य(बी.आर.टी.एस) यांचे दि.२०/०७/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सांगवी ते किवळे यादरम्यान उभारण्यात आलेल्या बीआरटी मार्गाला श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात यावे. शहराच्या विकासाचे नाव लौकीक करणारा हा मार्ग असुन या मार्गाला श्री. छत्रपती शिवाजी महाराज बीआरटी मार्ग असे नाव देण्याने या शहराचे नाव लौकीक होईल तसेच शहरातील सर्व नागरिकांसाठी ही बाब अभिमानास्पद ठरेल, तरी सदर बीआरटी मार्गाला श्री छत्रपती शिवाजी महाराज बीआरटी मार्ग असे नाव देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव -३३
क्र.गक्षेका/कावि/४/३५/२०१९
दिनांक - २९/७/२०१९